॥ श्री ॥

# श्री शिवराज्याभिषेकाचा पोवाडा

(शाहीर: कविभूषणसुत "प्रभाकर")

धन्य दिवस सोनियाचा आला। अमृताने न्हाला। झाला बोलबाला।
ऐसा राजा (छत्रपती) कधी होणे नाही। शिवाजी चमत्कार जणू काही।
प्रभाकर नित्य पोवाडा गाई ॥ धृ०॥

चाल: स्वातंत्र्याचा सूर्य बुडाला देवगिरीच्या नाशाने।
सुल्तानशाहीचे ग्रहण सुटेना गुलामगिरीमध्ये पद रुतले॥
मराठमोळ्याची झाली शेळी, भूषण बनले लाचारी।
शक्ती बुध्दी गहाण पडली, परकीयांची शिरजोरी॥
धर्ममंदिरे गाईवासरे भाषा संस्कृति अन् अबला।
वाली न उरला, कुणी लुटावे, कुंपण खाई शेताला॥

चाल: अन् चमत्कार काही झाला। अधर्माचा नाश करण्याला।
परदास्य बेडी तोडण्याला। स्वराज्याचं स्वत्व राखण्याला।
जिजाईच्या पोटी शिवशंभू पुन्हा अवतरला॥ शेतकरी
मावळा जमविला। स्वराज्याचा गड सर केला। त्राहि भगवान्
चारही पातशाह्या, नाकी दम आणला॥ रामराज्य आणलं देशाला
शेंडी राहिली त्यांच्या डोक्याला। गाई-वासरं राहली गोठ्याला।
माय-बहिणी ताठ मानेनं जगू लागल्या॥ धैर्याचा मेरुमणी झाला।
शौर्याला तोड कुठे बोला। कीर्ति पसरे भरतभूमीच्या कानाकोपऱ्याला॥
तीस वरसं काळ लोटला। स्वातंत्र्य आलं बहराला। मानानं जगू लागल
स्थैर्य आलं मऱ्हाठी राज्याला। औरंगजेब वेड्यावानी जाहला।
पुंड पाळेगार हिणविती काहीजण त्याला॥ हा कसला भूपती 'राज्य'
म्हणावं का याला॥ पिकतं तिथे विकत नाही हाच इथे मासला।

चाल: अशी स्थिती असताना वार्ता आली कानाला। काशीच्या
गागाभट्टांचा मुक्काम नाशकाला। महापंडित (साक्षात) प्रतिबृहस्पती
निघाले "दर्शनाला"। स्वतःहून शिवाजीस भेटण्याला॥ असे ऐकून
धाडले उपाध्याय आणि कारकून। रायगडास आणून आदरानं
केला सत्कार। वेदान्तसूर्य, विद्वन्चुडामणी 'दिवाकर'।
दिवाकर स्वागत केलं पूजन करून॥

चाल: गागाभट्ट झाले संतुष्ट। राजास केलं अन् स्पष्ट॥
शिरी छत्र आणि सिंहासन। सार्वभौमत्त्वाची खुण जाण॥
त्याशिवाय नाही पुर्णत्त्व। मान्यतेविना हे यत्न॥

चाल: "राजा तख्ती बसावे तुम्ही। व्हावे भूपती। फिरवावी द्वाही"।
काशीचे विश्वेश्वर बोलले। राजियासही ते मानिले।
आनंदाश्रु नकळत जिजाईनं टिपले॥

चाल: गंध शिंपले भाग्यतिथीवर,। मुहुर्त काढला सुंदर।
शालिवाहन शक १५९६। आनंदनामे संवत्सर॥
ज्येष्ठ महिन्यातील शुद्ध त्रयोदशी। दिवस आला शनिवार।
सूर्येदियापूर्वी तीन घटका। छत्र शिरी धरणार (सिंहासनी बसणार)
राजधानीही नक्की केली। रायगडावर लई प्यार।
तख्तास जागा हाच गड करा। आज्ञा हिराजी इंदुलकरा॥
अठरा कारखाने, बारा महाल। सज्ज करूनी केले तयार।
नविन बांधले जगदीश्वर मंदिर। विशाल राजमंदिर थोर॥
गंगासागराच्या दक्षिण किनारी। मनोरे बांधले सुंदर।
प्रवेशद्वारावर भव्य नगारखाना। हत्ती डौलात जाणार॥
अश्वशाळा, गजशाळा आणि। गोशाळाही बांधून तयार।
सुसज्ज शामियाने, मंडप। पाहुणे येणार वीस हजार॥

चाल: रायगड गजबजून गेला | आईसाहेब पांचाडाहून गडी आल्या मुक्कामाला
सारा गोतावळाही होता गडावरती जमा झाला | सोयराबाई आणि सर्व वाडे
हजर गडाला || शंभूराजे राजाराम होते त्यांचे साथीला || मुंग्यावाणी
पाहुण्यांची रीघ लागली गडाला || खास वकील इंग्रजांचा हेन्री
ऑक्सिंडेन आला ||

चाल: सरदार पेशवे आणि कारकून | झटली सारे मन लावून ||
देव देवला गेली अक्षत | ऋध्दि सिध्दिचा नायक ||
धार्मिक विधी सुरू होणार | त्याआधी प्रतापगडी स्वार ||
महापुजा भवानी मातेची | सुवर्णाचे छत्र वाही शिरी ||
राजा परत आला रायगडी | गागाभट्टांची पूर्ण तैय्यारी ||

चाल:- महाद्वारावर तोरण चढले | शिंगे (ताशे) चौघडे कडकडले ||
आवाहन गणराया केले | देव-देवक बसविले ||
मौंजिबंधना सिध्द जाहले | जगावेगळे कार्य भले ||
वय बटुचे चव्वेचाळीस | दहा विवाह आधी झालेले ||
सहा मुली आणि मुलगे दोन | हजर मुंजीला भले भले ||
गायत्रीची दिक्षा घेऊन, महाराज संस्कारित झाले ||
मौंजिबंधनाच्या दुसऱ्या दिवशी राजाचे शुभमंगल झाले ||
त्याच राण्यांशी पुन्हा विवाहित ब्रह्मचर्याचे दिन गेले ||
दसरा-दिवाळी जणू गडावरी विधी चालले थाटाने ||
तुळा सुवर्णाची केली रायानं पक्के दोन मण वजनाने ||
(सतरा हजार होनाने) ||
स्वातंत्र्याची पहाट फुलली त्रयोदशीच्या शुभदिवशी |
पहाटे पाचाला मुहुर्त लाभला, भूमी रोमांचित झाली ||
मंगल स्नाने करूनि आले राजसभा अति मोहरली |
वेदमंत्राचा घोष चालला इंद्रसभा जणू अवतरली ||
गंगा यमुना गोदा सरस्वती सिंधू नर्मदा कावेरी |
सप्त गंगा धन्य जाहल्या स्वातंत्र्याचे उदक शिरी ||

अमृताचा अभिषेक होता सुवासिनींची ओवाळणी।
शुभ्रवस्त्रालंकार लेवूनी शस्त्रे पुजोनी धारीयली॥

कोदंडधारी महाराज निघाले, सुवर्णदंडित प्रतिहारी।
अष्टप्रधान ~~व~~ चिटणीस यासहीत राजसभेटी उगवला रवि॥

चाल: बत्तीस मण सोन्याचे केले सिंहासन। रत्ने मौल्यवान जडवून।
रामाजी दत्तोने(चार माहिने) खपून। बत्तीस चिन्हे खास शोभत।
शोभत। आठखांबी मंडपित स्थिल॥ रत्नजडित छत्राला मोत्यांची झाल
सुवर्णाच्या भाल्यावर। झुले तराजू सुंदर। अश्व पुच्छे काहीवर।
सुवर्णाचे मत्स्य लटकत। लटकत, राजाचेन्हे (राज्याचिन्हे) सारी झळकत
।

चाल: स्वातंत्र्याचा झाला उषःकाल। सुर्योदयाला तीन घटका वेळ॥
महाराज सिंहासनासमोर। उजवा ~~गुडघा~~ गुडघा टेकला भूमीवर॥
मस्तक लवून केला नमस्कार। पुर्वाभिमुख उभे नंतर॥
मुहुर्ताची घटका भरताच।सिंहासनी झाले स्थानापन्न (आरुढ)॥
सारे विधी झाले शास्त्रोक्त। देवदेवता जाहल्या तृप्त॥
राज्याभिषेक शक सुरु होत। स्वतःची नाणी चलनात॥
चाल:- हा क्षण आला सुवर्णाचा। अमृतकौस्तुभाचा। हिंदवी राज्याचा।
स्वराज्याचे झडली ताशे चौघडे। तोफा बंदुकींचा नाद धडघडे।
अक्षतांची वृष्टी राजावर पडे॥ सिंहासनाधीश्वर झाले।
छत्र शिरी आले। नवल वर्तले।सार्वभौमत्वाचे कुंकु भाळी।
शत्रुपक्षाची झाली होळी। अशी वेळ युगायुगातून आली॥
कविभूषण प्रल्हादरायानं केला पाहिला पोवाडा॥ त्याचाच पुन
चाल:- प्रभाकर आपल्यापुढं खडा॥ त्रिसंवत्सरांनी उत्सव झाला केव्हा
भाग्य पितापुत्रांचं, सादर केला पोवाडा॥
मिळवणी:- स्वराज्याचा झेंडा फडकला। अधर्माचा घाला। गेला विलयाला। म्हणुनच
म्हटलं आम्ही तुम्हास। चमत्कार नाही का सांगा आम्हास। युगे युगे
स्मरण होईल देशास॥

मुंबई - आठ फेब्रुवारी १९७

— x o x —